महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र.३७४(२)/स्थापत्य/२०१९/१४-ब दिनांक-२२ सप्टेंबर, २०२१

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:- महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०१९ च्या मुलाखत कार्यक्रमाबाबत.**
**संदर्भ:- जाहिरात क्रमांक ०५/२०१९ व अधिसूचना क्रमांक १७/२०१९.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागांतील सहायक कार्यकारी अभियंता, स्थापत्य, गट-अ, सहायक अभियंता, स्थापत्य, गट-अ व सहायक अभियंता, स्थापत्य, गट-ब श्रेणी -२ तसेच मृद व जलसंधारण विभागातील उपविभागीय जलसंधारण अधिकारी, स्थापत्य, गट-अ व जलसंधारण अधिकारी, स्थापत्य, गट-ब या पदांकरीता दिनांक २४ नोव्हेंबर, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०१९ च्या लेखी परीक्षेचा सुधारीत निकाल दिनांक २३ जुलै, २०२१ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. मुख्य परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या ३६६४ उमेदवारांच्या पहिल्या टप्प्यातील उमेदवारांच्या मुलाखती खालील प्रमाणे घेण्यात येणार आहेत:-

| मुलाखत केंद्र | मुलाखत दिनांक |
|---|---|
| **पुणे (टप्पा-०१)**<br>एकूण उमेदवार ३२०/१०१५ | ४ ते ७ ऑक्टोबर, २०२१<br>११ ते १४ ऑक्टोबर, २०२१ |
| **नाशिक (टप्पा -०१)**<br>एकूण उमेदवार -३२०/७९१ | ४ ते ७ ऑक्टोबर, २०२१<br>११ ते १४ ऑक्टोबर, २०२१ |

३. सदर मुलाखतीकरिता उमेदवारांची संख्या जास्त असल्याने ही प्रक्रिया दोन टप्प्यात राबविण्यात येणार आहे.

४. मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येत असून त्यामध्ये मुलाखतीचे ठिकाण, दिनांक व वेळ नमुद करण्यात येईल.

५. कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर आयोगाकडून मुलाखतपत्रावर दिलेल्या सूचनांचे तसेच स्थानिक प्राधिकरणाकडून करण्यात आलेल्या उपाययोजनांचे पालन करणे अनिवार्य राहील.

ठिकाण- मुंबई.

उपसचिव, परीक्षा-२
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.